Impact Factor: 6.017

ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite

Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# दैनिक प्रजावाणी व दैनिक लोकमत वृत्तपत्रांनी प्रथम पृष्ठावर स्त्रीविषयक बातम्यांना दिलेले स्थान

केवटे अश्विनी श्यामराव
संशोधक,
पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी,
माध्यमशास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.
डॉ.सुहास पाठक
मार्गदर्शक,
प्राध्यापक,माध्यमशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

सारांश:

समाजात विविध प्रकारच्या समस्या रोजच निर्माण होत असतात त्या समस्यांच्या निराकरणासाठी सामाजिक अर्थाने समाजाला नेहमीच दक्ष असावे लागते. त्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घडामोडी पेक्षाही समाजात घडणाऱ्या दैनंदिन घटकांचा आपल्या जीवनमानावर परिणाम पडत असतो. हा परिणाम मुख्यतः प्रसारमाध्यमे, मित्र, समाज माध्यमे,कामाचे ठिकाण यासारख्या माध्यमातून लोकांच्या जीवनावर पडत असतो. आज ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता च्या काळातही समाजातील एक घटक नेहमीच दुर्लक्षित राहिलेला आहे तो म्हणजे स्त्री होय. स्त्री सुधारणा चळवळीच्या संबंधात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी वृत्तपत्रांनी नेहमीच भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे प्रत्येक काळात वृत्तपत्रे ही मानवी जीवनात नवा विचार पेरण्याचे काम करत

अली आहेत.आज घडीलाही समाजातील स्त्रीचे स्थान फारसे बदललेले नाही. केवळ तंत्रज्ञानाचाअविष्कार आणि सर्व क्षेत्रात स्त्रियांनी घेतलेली भरारी म्हणजे स्त्रियांची स्थिती बदललेली आहे असे म्हणता येणार नाही. आजही स्त्री ही पूर्ण स्वातंत्र्य नाही तिचे आजही शोषण अन्याय अत्याचार हे प्रकार नित्यच घडत आहेत. अशा परिस्थितीत दैनिक लोकमत व दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रांनी स्त्रीविषयक बातम्यांना आपल्या वृत्तपत्रात प्रथम पृष्ठावर कितपत स्थान दिले आहे?तसेच स्त्रियांच्या बाबतीत कोणकोणते मुद्दे उपस्थित केले आहेत? या संबंधित अध्ययन करत असताना दोन्ही वृत्तपत्रातील महिनाभरांच्या एकूण ३० अंकांचा आशय विश्लेषण पद्धतीच्या माध्यमातून अभ्यास करण्यात येणार आहे.

बीजसंज्ञा: वृत्तपत्र, प्रजावाणी, लोकमत, स्त्री ,बातमी.

प्रस्तावना:

प्राचीन काळापासूनच स्त्रियांना दुय्यम स्थान देणाऱ्या भारतीय समाज व्यवस्थेत देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानंतरही भारतीय समाजातील स्त्रियांचे जीवन हे दुय्यम दर्जाचे आहे. त्यामुळे त्यामुळे स्त्रियांचा प्रश्न हा नेहमीच ऐरणीवर आलेला दिसून येतो. मग तो महिलांच्या अन्याय अत्याचाराचा प्रश्न असो की, स्त्रियांना न मिळणाऱ्या न्याय हक्क अधिकाराचा असो. स्त्रियांकडे बघण्याची समाजाची संकुचित वृत्ती आजही बदललेली नाही. त्यामुळे स्त्री ही केवळ चूल

आणि मुल एवढ्या पुरतेच तिचे अस्तित्व आज ए आय च्या काळातही म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातही स्त्रियांच्या बुद्धिमत्तेला नगण्य स्थान आहे. स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन आजही बदललेला नाही. अशा या स्त्रियांच्या बाबतीत प्रसार माध्यमे नवनवीन चर्चासत्रे न्यू नवीन विषयांवर संवाद आणि महिलांच्या संदर्भाने अनेक प्रकारच्या जाणीव जागृती सारखे उपक्रम नेहमीच राबवतात. तरीही त्या तुलनेमध्ये आज प्रसार माध्यमांमध्ये विशेष वर्तमानपत्रांमध्ये काही मोजके आणि बोटावर मोजण्याइतक्याच महिला पत्रकार आढळून येतात. ज्या काही महिला पत्रकार आढळतात त्या महिला पत्रकार मोठमोठ्या नामांकित वृत्तवाहिन्या मधून निवेदनाची काम करतात. हा सारा प्रकार पाहता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे नवनवीन डिजिटल माध्यमे समाज माध्यमे नवनवीन वृत्तवाहिन्यांचे बदलते स्वरूप या संबंध प्रसार माध्यमांमध्ये वृत्तपत्राचे महत्त्व आजही तितकेच महत्त्वाचे ठरत आहे. वर्तमानपत्रे ही वाचन संस्कृतीला चालना देणारे असून वृत्तपत्राचा अभ्यास म्हणजेच संयम, शांतता, आकलन आणि वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या महिलाविषयक सदर या संबंधात बारकाईने अभ्यास करता येतो. पुन्हा पुन्हा त्याची उजळणी करता येते. म्हणून प्रसार माध्यमाचे स्वरूप आज दिवसेंदिवस बदलत असले तरीही वृत्तपत्राची विश्वासहार्यता कायमच समाजामध्ये राहिलेली दिसून येते. म्हणून वर्तमानपत्रे ज्या अर्थाने समाजाचा आरसा म्हणून काम करतात त्याच बाबतीत वर्तमानपत्रे स्त्रियांच्या संबंधित असणाऱ्या आणि विशेष अर्थाने वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर मथळा त प्रकाशित करून महिलांच्या संबंधित असणारी विविध मुद्दे वृत्तपत्राच्या

माध्यमातून मांडली जातात काय हा अभ्यासही तितकाच महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे स्थानिक दैनिक म्हणून दैनिक प्रजावाणी व मराठीतील अग्रणी दैनिक लोकमत या वृत्तपत्राच्या नांदेड जिल्हा पुरवणी म्हणजेच हॅलो लोकमत वरील प्रथम पृष्ठावर स्त्रियांशी संबंधित वार्तांकनाला विशेष स्थान देण्यात आले आहे काय ? या संबंधातील एकूण महिन्याभरातील ३० अंकाची अभ्यासाच्या दृष्टिकोनातून निवड करण्यात आलेली आहे तसेच महिलाविषयक बातम्यांना या वृत्तपत्रांनी दिलेल्या स्थानाचा अभ्यास ही बाब निश्चित करता येते. त्यामुळे प्रस्तुत निबंधामध्ये आजच्या घडीला मराठी वृत्तपत्रांच्या बाबतीमध्ये महिलांच्या विकासामध्ये आणि एकूणच त्यांच्याशी केंद्रित बातम्यांना प्रसार माध्यमातून विशेषतः वृत्तपत्रातून प्रसिद्धी देत असताना योग्य तो न्याय मिळतो काय हा एक महत्त्वाचा संशोधनाचा भाग असून त्याच महिलांच्या संबंधित वृत्तपत्राची भूमिका अभ्यासत असताना महिलांच्या संबंधित असणाऱ्या अनेक बातम्या ह्या मुख्य पृष्ठभागावर देण्यातही वृत्तपत्रे मागे पडतात. त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून वृत्तपत्रांची जबाबदारी ही मागे पडल्यासारखी दिसून येते हेच वास्तव आज मराठी वृत्तपत्र प्रमाणेच अन्य भारतीय भाषिक वृत्तपत्रामधूनही दिसून येते. त्यामुळे या संशोधनाच्या अनुषंगाने निवडण्यात आलेली दोन्ही वृत्तपत्रे ही मराठी आहेत. नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाच्या घडामोडी माहिती आणि बातम्या या संपूर्ण यथायोग्य प्रसारणातील मुद्दे हे वर्तमानपत्रातून जनतेपर्यंत पोहोचत असतात. नांदेड जिल्ह्यातील ही दोन्ही वृत्तपत्रे सर्वाधिक वाचक वर्ग असलेली वृत्तपत्रे आहेत. परंतु महिलांच्या संदर्भातील प्रश्नांना वाचा फोडून

निकाली काढण्यापर्यंत वृत्तपत्राची भूमिका मी पक्षपाती आढळून येत नसल्याने त्याचाच एक आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून महिलांच्या संबंधातील बातम्या आणि वृत्तपत्राची भूमिका हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

मराठी वृत्तपत्राचा उदय:

२९ जानेवारी, १७८० रोजी जेम्स ऑगस्टस हिकी याने हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र 'बेंगॉल गॅझेट' तथा 'कलकत्ता जनरल ‘ऍडव्हर्टायझर’ या नावाने सुरू केले. 'हिकीज गॅझेट' नावाने ते प्रसिद्ध आहे. कलकत्त्यामध्ये वृत्तपत्रसृष्टीचा पाया रोवणाऱ्या हिकीच्या प्रयत्नाने कलकत्ता, मद्रास, मुंबई येथेही वृत्तपत्रे निघू लागली. मुंबईतील पहिले वृत्तपत्र 'बाँबे हेरॉल्ड' १७८९ साली निघाले. प्रारंभीची वृत्तपत्रे ही इंग्रजी भाषेतील होती. शिक्षणाने वाचकवर्ग तयार झाल्यानंतर, म्हणजे ४० वर्षांनी विविध भाषेतील हिंदुस्थानी वृत्तपत्रे निघू लागली. 'फर्दुनजी मर्झबान' या पारशी गृहस्थाने १८२२ साली 'मुंबईना समाचार' हे पारशी वृत्तपत्र सुरू केले. त्यावेळी मुंबई हे मराठी भाषिकांचे मोठे शहर असल्यामुळे मुंबईत गुजराती वृत्तपत्र निघाल्यावर लगेचच मराठी वृत्तपत्र निघाले. मुंबईत वृत्तपत्रास आवश्यक ते वातावरण व आधुनिकता असल्यामुळे नवे विचार समजून घेण्याची मानसिकता तेथे निर्माण झाली होती.

मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा मान आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' वृत्तपत्राला दिला जातो. तथापि, 'दर्पण'च्या अगोदर एक मराठी वृत्तपत्र 'मुंबापूर वर्तमान' अस्तित्वात असल्याचा पुरावा मात्र मिळतो. २० जुलै, १८२८ रोजी त्याचा पहिला अंक निघाला होता. परंतु, त्याचा चालक कोण व ते किती काळ चालले, याचा पत्ता लागत नाही. २३ जुलै, १८२८ च्या बाँबे गॅझेटमध्ये 'एक विक्षिप्त' यांच्या लेखावरून त्याची माहिती मिळते. परंतु, 'मुंबापूर वर्तमान' या वृत्तपत्राला आद्य मराठी वृत्तपत्र म्हणावे, असा पुरावा सापडत नाही. म्हणून कालानुक्रमे 'दर्पण' हेच आद्य वृत्तपत्र आहे.

बाळशास्त्रींनी 'दर्पण' हे नाव जाणीवपूर्वक योजले असावे. 'दर्पण'मध्ये इंग्रजी व मराठी मजकूर देण्याची पद्धती होती. त्यामुळे 'समाचार दर्पण' या वृत्तपत्रावरून 'दर्पण' हे नाव सुचले असावे. 'दर्पण'चा पहिला अंक ६ जानेवारी, १८३२ रोजी निघाला. वृत्तपत्राचा आकार १९× ११ इंच असून, त्याची आठ पाने होती. पानातील दोन स्तंभापैकी डावीकडे इंग्रजी व उजवीकडे मराठी मजकूर असे. त्रैमासिक वर्गणी रु. ६ होती. खपाची संख्या मात्र ३०० च्या वर गेली होती. 'दर्पण' काही महिने पाक्षिक होते. पण, अनेक विषय पंधरा दिवसांनी लिहायचे म्हणजे शिळे होत, म्हणून त्याचे साप्ताहिकात रूपांतर केले. बाळशास्त्रींबरोबर दर्पणचे काम रघुनाथ हरिचंद्रजी, वासुदेव जनार्दनजी पाहात असत. आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे ते साडेआठ वर्षे चालले व १ जुलै, १९४० पासून ते बंद केले. समर्थ अशी व्यावसायिक पाठराखण नसल्यामुळे ते बंद करावे लागले.” याचवेळी १८४२ मध्ये अहमदनगर येथे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ज्ञानोदय हे मासिक सुरू केले.प्रभाकर हे वृत्तपत्र २४

ऑक्टोबर १८४९ रोजी सुरू झाले. प्रभाकरची प्रेरणा सामाजिक परिवर्तनाची होती. भाऊ महाजन हे प्रभाकरचे संपादक होते. पुण्यातून निघालेले पहिले वृत्तपत्र म्हणजे मित्रोदय, ते १८४४ साली निघाले, पण लवकरच बंद पडले. ज्ञानप्रकाशमधून पुण्यातील वृत्तपत्र व्यवसायाला व पत्रकारितेला खऱ्या अधिन प्रारंभ झाला. १२ फेब्रुवारी १८४९ रोजी ज्ञानप्रकाश सुरू झाले. १८५३ मध्ये ते द्विसामाहिक झाले. या पत्राची मालकी सुमारे ६० वर्षे कृष्णाजी रानडे यांच्याकडे होती. १५ ऑगस्ट १९०४ रोजी त्याचे रूपांतर दैनिकात झाले. वासुदेव गोविंद आपटे संपादक असताना हे रूपातंर घडले.जानेवारी १८६२ पासून इंदुप्रकाश हे वृत्तपत्र मुंबईहून प्रसिद्ध होऊ लागले. ते काढण्यात लोकहितवादींचाच पुढाकार होता. इंदुप्रकाश इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतून प्रकाशित होई. विरेश्वर ऊर्फ तात्या छत्रे यांचे ज्ञानसिधू (१८४२), कृष्णशास्त्री चिपळूनकरांचे विचारलहरी (१८५२), हिंदु पंच (१८५२) ही वृत्तपत्रे निघाली. मराठी वृत्तपत्रातून व्यंगचित्र छापण्याची प्रथा हिंदू पंचने सुरू केली.पुण्यातील 'न्यू इंग्लिश स्कूल'शी संबंधित असलेल्या सहा तरुणांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेतून स्फूर्ती घेतली. मराठा व केसरी ही इंग्रजी व मराठी वृत्तपते अनुक्रमे २ जानेवारी व ४ जानेवारी १८८१ रोजी पुण्यातून त्यांनी प्रकाशित करण्यास सुरुवात केली. लोकमान्य टिळक हे मराठीचे पहिले संपादक तर गोपाळ गणेश आगरकर हे केसरीचे पहिले संपादक होते.

महिला आणि प्रसार माध्यमे:

भारतीय समाज व्यवस्थेत महिला नेहमीच व्यवस्थेकडून शोषणाच्या शिकार राहिलेले आहेत. त्यामुळे महिला आणि समाज यांचा अंतर संबंध स्पष्ट करत असताना आपणास महिला या पिचलेल्या नडलेल्या शोषित अत्याचारीत गुलामगिरीत अडकलेल्या दिसतात. तीच अवस्था आजही वृत्तपत्र आणि प्रसार माध्यमातून दिसून येते. म्हणून महिला आणि प्रसार माध्यमाचा अभ्यास करत असताना वृत्तपत्रांमध्ये केवळ बोटावर मोजण्या इतपत महिलांचे पत्रकार म्हणून प्रतिनिधित्व दिसून येते. एकंदरी त आज विज्ञानाच्या अविष्कारातून नवनवीन संशोधने नव्याने निर्माण होत आहेत. त्यात महिलांचा सहभागी तितकाच महत्त्वाचा आहे. पुरुषाच्या बरोबरीने आणि पुरुषाच्या एक पाऊल समोर जाऊ नये महिला विविध प्रकारच्या क्षेत्रामध्ये आपली छाप पाडून वेगवेगळ्या क्षेत्रातील वेगवेगळ्या जबाबदाऱ्या नेटाने पार पाडत आहेत. अशी परिस्थिती असली तरीही भारतीय समाज व्यवस्थेतील महिलांच्या संबंधित मानसिकता आजही बदललेली दिसून येत नाही. एखाद्या उच्च क्षेत्रामध्ये महिला कार्य करत असेल तर त्यावर तिच्या वरिष्ठांकडून तुझे होणारे शोषण अवहेलना या गोष्टी आजही समाजामध्ये पहावयास मिळतात म्हणून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस पेट घेत असल्याचे दिसून येते.  वृत्तपत्रे ही सामाजिक न्यायची दक्ष पहारेकरी असल्याने ते महिलांच्या संदर्भातही अनेक प्रश्न निर्माण करून आपली भूमिका बजावत असतात पण महिलांचे प्रश्न पुन्हा नव्याने निर्माण होताना दिसतात. अशा परिस्थितीत प्रसार माध्यमातील सामाजिक मूल्ये, वर्तन

आणि विचारसरणी घडवण्यात माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. समाजात माहिती प्रसारित करण्यात, मानवी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकासात योगदान देण्यास माध्यमे योगदान देतात. तथापि, आज माध्यमे केवळ व्यावसायिक स्वरूपाची झाली आहेत, सामाजिक समस्या आणि आकांक्षा, विशेषतः महिलांशी संबंधित, पुरेशा प्रमाणात हाताळण्यात अपयशी ठरत आहेत. एकीकडे आपणास असे आढळून येते की,"संपूर्ण जग कृषीप्रधान समाजातून माहिती समाजात रूपांतरित झाले आहे आणि ते ज्ञानप्रधान समाज बनणार आहे; परंतु महिलांना अजूनही लिंग असमानता, रूढीवाद आणि शोषणाविरुद्ध लढावे लागत आहे". त्यामुळे प्रेसनेही महिलांना आपला व्यवसाय वाढवण्यासाठी वस्तू म्हणून वापरले आहे. महिलांशी संबंधित गंभीर समस्यांवर सध्या प्रेस ज्या असंवेदनशील पद्धतीने भाष्य करत आहे ते चिंतेचे कारण बनले आहे. लैंगिक अत्याचार, छेडछाड, हुंडा आणि सन्मान हत्या यासारख्या महिलांवरील अत्याचारांच्या घटनांबद्दल दररोज बातम्या प्रकाशित होतात.

म्हणून आजच्या परिस्थितीच्या संबंधात वृत्तपत्रे आणि एकूणच प्रसार माध्यमांच्या बाबतीमध्ये एक या प्रकारची एकजीनसीपणा आहे की, भारतातील स्त्रिया ह्या विविध प्रकारच्या क्षेत्रामध्ये कार्य करत असतात; पण त्यांच्या संबंधातील वृत्तपत्र किंवा अन्य प्रसार माध्यमातून दर्शविण्यात येणारी प्रतिमा ही काय अंशी महिला आणि पुरुष यांच्या लिंग समानतेच्या बाबतीत दुय्यम दर्जाच्या आढळून येते. म्हणून आजच्या परिस्थितीचा वास्तवाते संदर्भ घेऊन त्यावर आपले मत मांडत असताना प्राध्यापक

लांडगे म्हणतात की, “भारतातील सद्यः स्थितीत स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत व दर्जात सुधारणा होत आहे. तसेच महिलांच्या बाबतीत लिंग विषमता आज पुर्णपणे भारतीय समाजातुन नष्ट झालेली नाही. धार्मिक सामाजिक प्रभावामुळे स्त्रिया पुरूषापेक्षा कनिष्ठ मानल्या जातात. चुल आणि मुल एवढेच कार्यक्षेत्र म्हणून मानले जाते; पण आज बदल झालेला आहे. भारतीय समाज व्यवस्थेत प्रबोधनाच्या माध्यमातून व प्रसार माध्यमातुन स्त्रियांच्या चळवळी बनत आहेत. स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी त्या सक्षम होत आहे. स्त्रियांमध्ये आत्मीयतेची भावना वाढीस लागत आहे. आर्थिक राजकिय शैक्षणिक या सर्वच क्षेत्रात आज मोठया प्रमाणावर स्त्रियाचा सहभाग वाढत आहे. प्रसारमाध्यमांचा दृष्टिने स्त्रियांना आपले वर्चस्व करण्यासाठी संधी प्राप्त होत आहे. आज सोशल मिडीयाच्या माध्यमातुन स्त्री सशक्तीकरणाच्या भुमिका प्रभावी बनत आहे. आज स्त्रियाला मिळालेल्या घटनेचा अधिकार कायद्याने संरक्षण शासनाची कल्याणकारी भुमिका व प्रसार माध्यमांची भुमिका यामुळे घरात बसुन पडद्यामागे राहणारी स्त्री आज घराच्या बाहेर पडून नोकरी उद्योग व्यवसाय समाजकल्याण राजकारण अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात काम करताना दिसुन येते. भारती प्रसार माध्यमात स्त्री ही नेहमीच पडद्यामागे राहिलेली दिसून येते. त्यात मुख्य बाब म्हणजे वृत्तपत्रातून महिलांना नेहमीच उपेक्षित ठेवलेली दिसून येते. महिला विकासाच्या बाबतीमध्ये कोणत्याही प्रकारच्या उपयोजनात्मक मांडणी ही वृत्तपत्रातून दिसून येत नाही. त्यामुळे एकूणच वृत्तपत्रांमध्ये महिलांच्या बाबतीमध्ये अतिशय अल्प स्थान देऊन महिलांना कमी लेखण्याचा दर्जा हा वृत्तपत्रांमधून

पहावयास मिळतो. त्यामुळे वर्तमानपत्राच्या अशा वृत्तीच्या संदर्भामध्ये स्त्रियांनी दास म्हणतात की "बहुतेकदा महिलांच्या घरमालकीण आणि पारंपारिक भारतीय मूल्य व्यवस्थेचा अविभाज्य भागीदार म्हणून लिंगभावात्मक प्रतिमा कायम ठेवतात. सहसा, महिलांचे प्रश्न आणि समस्या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर दुर्लक्षित केल्या जातात जोपर्यंत ती भयानक हत्या (उदा. आरुषी-प्रकरण) किंवा बलात्काराचा खटला (उदा. निर्भया-प्रकरण) नसतो, जोपर्यंत मीडिया बेजबाबदार आणि खळबळजनक वृत्तांकन आणि पीडित महिलेची चारित्र्यहत्या करून संवेदनशीलपणे हाताळण्यात अपयशी ठरतो. खरं तर, महिलांसाठी समर्पित वृत्तपत्रातील पानांवर सहसा महिला विकास किंवा सक्षमीकरणाशी संबंधित विषयांवर लक्ष दिले जात नाही, परंतु सौंदर्य टिप्स, स्वयंपाकाच्या पाककृती, फॅशन स्टेटमेंट्स, महिलांना सुंदर बनवण्यासाठी उत्पादने आणि सेवांच्या जाहिरातींवर विस्तृत वृत्तांकन केले जाते. सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक-राजकीय-धार्मिक समस्या अशा विविध आयामांच्या महिलांबद्दल बहिष्कार टाकण्याविरुद्ध वृत्तपत्रांमध्ये संवेदनशीलतेचा अभाव आहे हे दुर्दैवी आहे. समाज आणि लोकांना अधिक संवेदनशीलता आणि सहानुभूतीने हा मुद्दा हाताळण्यास मदत करण्यासाठी माध्यमांनी या मुद्द्यांवर सक्रिय आणि सकारात्मक लक्ष केंद्रित केले पाहिजे. महिलांच्या समस्या, गरजा आणि हितसंबंधांवर मर्यादित कव्हरेजमुळे धोरणकर्त्यांकडून - प्रतिकूल लिंग गुणोत्तर; बाल आणि माता मृत्युदर; महिलांवरील हिंसाचार; आरोग्य आणि रोग; गरिबी, बेरोजगारी आणि उपासमारीचे महिला आणि त्यांच्या कुटुंबांवर होणारे परिणाम - यासारख्या गंभीर मुद्द्यांकडे लक्ष

दिले जात नाही. उलटपक्षी, वर्तमानपत्रे चित्रपट अभिनेत्री, मॉडेल, व्हिडिओ जॉकी (व्हीजे/डीजे), श्रीमंत महिला आणि त्यांच्या छंदांच्या छायाचित्रे आणि मुलाखतींनी भरलेली असतात. अनेक महिला मासिके 'शरीर आणि लैंगिकता' - फॅशन, ग्लॅमर, सौंदर्य साधने, वजन कमी करणे, स्वयंपाक आणि 'स्त्री प्रवृत्ती' आणि 'आकर्षकता' साठी तीक्ष्ण साधने तयार करतात जेणेकरून पुरुष आणि सासू-सासऱ्यांना आनंदी ठेवता येईल. तुलनेने, महिलांसाठी करिअर संधी, आरोग्य जागरूकता, उद्योजकता, कायदेशीर मदत, समुपदेशन सेवा, बालसंगोपन सेवा आणि आर्थिक व्यवस्थापन यावर मर्यादित कव्हरेज आणि लेख आहेत. केस स्टडीजवरून असे दिसून येते की वर्तमानपत्रे महिलांच्या विकासाच्या मुद्द्यांना महत्त्व देत नाहीत आणि महिलांशी संबंधित अनुक्रमे फक्त ५% आणि ८% मुद्दे मुख्य पानावर प्रकाशित करतात आणि उर्वरित मुद्दे आत ठेवतात (न्यायाधीश जी, एन. रे यांनी उद्धृत केल्याप्रमाणे). तथापि, प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधन निष्कर्षांचा मोठा भाग वाचकांचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रकाशित तथ्यांची प्रासंगिकता आणि सत्यता तपासल्याशिवाय त्यांच्या अंकांची अधिक विक्री करण्यासाठी खळबळजनकपणे पॅकेज केला जातो. म्हणूनच, सार्वजनिक हितासाठी, प्रकाशित होत असलेल्या संशोधन आणि तथ्यांवरील माहिती पूर्णपणे उघड करण्याची जबाबदारी मुद्रित माध्यमांनी घेतली पाहिजे जेणेकरून वाचक ते गांभीर्याने घेतील आणि त्यावर कारवाई करतील." अशाप्रकारे वृत्तपत्रे आणि महिला यांच्यातील अंतर संबंध आणि भूमिका स्पष्ट करता येते.

दैनिक प्रजावाणी:

दैनिक प्रजावाणी हे नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे स्थानिक वृत्तपत्र आहे. मराठवाड्यातील वृत्तपत्राच्या कारकीर्दीत दैनिक प्रजावाणीचे अनन्यसाधारण महत्त्व असून जवळपास ६२ वर्षांपासून हे वृत्तपत्र नांदेड जिल्ह्यातील विविध प्रकारच्या राजकीय, सामाजिक ,आर्थिक ,शैक्षणिक स्त्री विषयक ,साहित्य ,कृषी यासारख्या अनेक प्रकारच्या बातम्या देऊन हे वृत्तपत्र नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे स्थानिक वृत्तपत्र आहे. या वृत्तपत्राचे संस्थापक संपादक कै. सुधाकर डोईफोडे हे असून त्यांनी हे वृत्तपत्र दीर्घकाळ चालले असून आज या वृत्तपत्राची संपूर्ण जबाबदारी त्यांचे सुपुत्र आणि दैनिक प्रजावाणीचे मुख्य संपादक शंतनू सुधाकर डोईफोडे हे आहेत. दैनिक प्रजावाणी हे वृत्तपत्र आज घडीला नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक वाचक वर्ग असलेले स्थानिक वृत्तपत्र असून या वृत्तपत्राच्या माध्यमातून जिल्हाभरातील विविध प्रकारच्या सामाजिक क्षेत्रातील घडामोडी बरोबरच राजकीय क्षेत्रातील घडामोडी विशेषता स्थानिक राजकारणाच्या बाबतीत महत्त्वाचे विश्लेष या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असते.

दर रविवारी महिलांच्या संबंधात एक विशेष पान प्रसिद्ध होत असते. यामध्ये विविध क्षेत्रातल्या मान्यवर महिला तसेच यशस्वी उद्योजक महिला आणि महिलाविषयक जनजागृती याबरोबरच महिलांच्या विविध प्रकारच्या यशोगाथा या संबंधित या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होतात. त्यामुळे नांदेड जिल्ह्याच्या स्थानिक वृत्तपत्रीय कारकीर्दीत दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्राचे अनन्य साधारण महत्त्व

आहे. या वृत्तपत्राने नांदेड जिल्ह्याच्या विकासाच्या अनुषंगाने तसेच शासनाची योजना आणि ध्येय धोरणे ही जिल्ह्यातील सर्व दूर विखुरलेल्या जनमान्यात पोहोचण्याचे काम हे वृत्तपत्र नित्यनियमाने करत आहे. विविध प्रकारच्या बातम्या बरोबरच हे वृत्तपत्र जाहिरात आणि प्रसिद्धीच्या बाबतीमध्ये महत्त्वाचे दैनिक असून नांदेड जिल्ह्यातील कोणत्याही प्रकारच्या जाहिराती आणि विविध प्रकारची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यात दैनिक प्रजावाणी हे वृत्तपत्र नेहमीच अग्रेसर राहून आपली भूमिका बजावत आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये अनेक प्रकारची स्थानिक वृत्तपत्रे असताना देखील दैनिक प्रजावाणीने आपली एक स्वतःची ओळख करून प्रसार माध्यमाच्या आजच्या बदलत्या स्वरूपातही विश्वासहार्य आणि पारदर्शकतेच्या अनुषंगाने निपक्षपाती पत्रकारिता करण्याचा एक विडाच उचलला आहे. अशा प्रकारचे हे वृत्तपत्र असल्याने या प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी वृत्तपत्राची निवड करण्यात आली . या वृत्तपत्राचे एकूण ८ पृष्ठ आहेत. त्यामध्ये रंगीत व कृष्णधवल यांचा समावेश आहे. दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्राचे एका पृष्ठाचे मुद्रित क्षेत्रफळ =३२×४२= १३४४ सेमी अशा स्वरूपाचे आढळून येते. नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे वृत्तपत्र असून या वृत्तपत्रांमधून प्रकाशित स्त्रीविषयक बातम्यांचा अभ्यास करण्यासाठी १ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ हा कालखंड निवडला असून यातील एकूण ३० अंकांची निवड ही अभ्यासाच्या दृष्टिकोनातून करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने दैनिक प्रजावाणी वृत्तपत्रांनी स्त्रीविषयक बातम्यांना आपल्या वृत्तपत्रात महिनाभरात कितपत स्थान दिले या संबंधित अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

दैनिक लोकमत ( हॅलो नांदेड)

लोकमत हे मराठी महत्त्वाचे अग्रेसर असणारे लोकप्रिय वृत्तपत्र असून "लोकमतच्या इतिहासात स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी आहे. १९१८ मध्ये लोकमान्य टिळक यवतमाळला आले होते. त्यावेळी त्यांनी लोकनायक बापुजी अणे यांना लोकमत साप्ताहिक काढण्याची सूचना केली. लोकनायक बापूजी अणे यांनी लोकमत साप्ताहिक १९१८९ ला सुरू करून १९३३ पर्यंत चालवले. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यास चेतना निर्माण करण्याचे कार्य या साप्ताहिकाच्या माध्यमातून केले. जंगल सत्यागृह काळात हे साप्ताहिक बंद पडले.'बंद पडलेले साप्ताहिक सुरू करण्याचा विचार स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या मनात आला. त्यांनी स्वातंत्र्यांनंतर स्वराज्य स्थापनेच्या स्वप्नांसाठी १९५३ मध्ये लोकमत साप्ताहिकाला नवा जन्म दिला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी १९६० पर्यंत लोकमत साप्ताहिक स्वरूपात सुरू ठेवली. १९६० त्याचे द्विसाप्ताहिकात रूपांतर केले. १९७१ लोकमत नागपूरहून दैनिक स्वरूपात सुरू केला. (स्व.) जवाहरलाल दर्डा यांनी लावलेल्या छोट्या रोपट्याचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले आहे." दैनिक लोकमत या प्रसिद्ध मराठी वृत्तपत्रातील विशेष पुरवणी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रसिद्ध होत असते. त्यात प्रामुख्याने नांदेड जिल्ह्याच्या स्थानिक बातम्यांच्या संबंधात हॅलो नांदेड ही विशेष पुरवणी नांदेड जिल्हा भरात वाचकांपर्यंत पोहोचत असते. या हॅलो नांदेड यापूर्वीचा एक विशेष वाचक वर्ग असून दैनिक प्रजावाणी हे नांदेडचे स्थानिक वृत्तपत्र असून त्याच अनुषंगाने तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून लोकमत वृत्तपत्राची स्थानिक

पुरवणी हॅलो नांदेड हे अभ्यासासाठी निवडण्यात आली आहे एकूण ४ पृष्ठ असलेलीही पुरवणी नांदेड जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,कृषी,स्त्रीविषयक,आरोग्यविषयक,साहित्य यासारख्या विविध प्रकारच्या बातम्यांचे स्वरूप या पुरवणीमध्ये दिसून येते. यामध्ये प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी १ सप्टेंबर २०२३ चे ३० सप्टेंबर २०२४ या कालखंडाची निवड करून त्यातील निवडक ३० अंकांचा या शोध निबंधासाठी आधार घेण्यात आलेला आहे.

संशोधन कलावधी: १ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३

लोकमत

महिलाविषयक बातम्यांचे आशय विश्लेषण

लोकमत (हॅलो नांदेड ) एका पृष्ठाचे मुद्रित बक्षेत्रफळ =३२×५२= १६६४ सेमी

हॅलो नांदेड एक दिवसाचे मुद्रित क्षेत्रफळ:६६५६ सेमी

महिनाभरातील पृष्ठाचे एकूण मुद्रित क्षेत्रफळ= १९९६८० सेमी

दैनिक लोकमत ( हॅलो नांदेड) वृत्तपत्राने महिलाविषयक बातम्यांना दिलेले स्थानः ३१००.२५ सेमी

टक्केवारी १.५%

प्रजावाणी

महिलाविषयक बातम्यांचे आशय विश्लेषण


प्रजावाणी वृत्तपत्राचे एका पृष्ठाचे मुद्रित क्षेत्रफळ =३२×४२= १३४४ सेमी

एका दिवसाचे एकूण पृष्ठाचे मुद्रित क्षेत्रफळः १०७५२ सेमी

महिनाभरातील पृष्ठाचे एकूण मुद्रित क्षेत्रफळ= ३२२५६० सेमी

प्रजावाणी वृत्तपत्राने महिनाभरात महिलाविषयक बातम्यांना दिलेले स्थानः १६८६.२५ सेमी टक्केवारी

-०.५



एकंदरीत दैनिक लोकमत (हॅलो नांदेड) स्थानिक पुरवणी व दैनिक प्रजावाणी एक स्थानिक वृत्तपत्र या दोन्ही वृत्तपत्रातील महिनाभरात प्रसिद्ध झालेल्या सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ या महिलाविषयक वृत्तपत्राचा अभ्यास केला असता त्यात असे आढळून आले की दैनिक लोकमत या वृत्तपत्रातून महिला विषयक बातम्यांना अधिक स्थान देण्यात आले तर स्थानिक वृत्तपत्र असलेले दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रांनी महिनाभरात अत्यल्प अशा स्वरूपात महिलाविषयक बातम्यांना प्रसिद्धी दिल्याचे आढळून येते.

निष्कर्ष:

१) दैनिक लोकमत हॅलो नांदेड या वृत्तपत्रातून महिनाभरात महिलाविषयक बातम्यांना १.५ % इतके अधिक स्थान दिलेले आढळून येते.

२) तर दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रातून महिनाभरात महिला विषयक बातम्यांना अत्यल्प स्थान म्हणजेच ०.५% इतके स्थान दिलेले आढळून येते.

३) दैनिक लोकमत या वृत्तपत्रातून नियमितपणे महिलाविषयक बातम्या प्रकाशित होत असल्याचे आढळले

४) तर दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रातून महिलाविषयक बातम्यांच्या बाबतीत अनियमितता आढळून आले आहे

संदर्भ:

१) शिवकुमार सोनाळकर (फेब्रुवारी २०२२) महाराष्ट्राचे कारागीर बाळशास्त्री जांभेकर,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृष्ठ,९-१०

२) प्रा.लांडगे गंगाधर वैजनाथ, भारतातील लिंगभेद, जाती व धर्म आणि माध्यमांचा आक्षेप, विद्यावार्ता आंतरविद्याशाखीय रिसर्च जर्नल्स, विशेष अंक, जानेवारी २०१९, पृष्ठ-२२५

४) https://ebooks.inflibnet.ac.in/hsp14/chapter/womens-portrayal-and-role-in-media/

५)बाविस्कर विजय (सप्टेंबर २०१०) लोकमत: लोकमान्य लोकनायक, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र,
संपादित रवींद्र बेडकीहाळ ,पृष्ठ २९३

३) लेले रा.के. (२००४) भारतीय भाषेतील वृत्तपत्रे, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास द्वितीय अवृत्ती,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे पृष्ठ-४२

४) लोकमत,अंक १ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३

५) सकाळ,अंक १ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३